# भारतीय पुरावा अधिनियम

# Indian Evidance Act १८७२

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक

# कलम ४५ :- तज्ञांची मते

जेव्हा विदेशी कायद्याच्या किंवा शास्त्राच्या किंवा कलेच्या एखाद्या मुद्याबाबत अथवा हस्ताक्षर किंवा बोटांचे ठसे हे तेच आहेत किंवा काय? याबाबत न्यायालयाला मत बनवायचे असेल, तेव्हा अशा विदेशी कायद्यात, शास्त्रात किंवा कलेत अथवा हस्ताक्षरांची किंवा बोटांच्या ठशांची ओळख पटविण्याच्या प्रश्नांबाबत विशेष कौशल्या संपादन केलेल्या व्यक्तींची त्या मुदयांवरील मते हि संबध्द तथ्ये असतात.

अशा व्याक्तींना तज्ञ असे म्हटले जाते.

# कलम ४५ अ :- इलेक्ट्रॉनिक पुराव्याच्या तपासणीसाचे मत

कार्यवाहीच्या दरम्यान जेव्हा न्यायालयाला संगणक साधनामध्ये पारेषीत केलेल्या किंवा साठविलेल्या किंवा इतर कोणत्यातरी इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल स्वरुपात असलेल्या कोणत्याही माहीतीच्या संबधात मत तयार करावयाचे असेल तेव्हा माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००० याचे कलम ७९-अ, मध्ये निर्देष्टीत केलेल्या इलेक्ट्रॉनिक पुराव्याच्या तपासणीसाचे मत हे संबध्द तथ्ये असेल.

# कलम ४६ :- तज्ज्ञांच्या मतांशी संबधीत तथ्ये

तज्ज्ञांची मते संबध्द असतांना एरव्ही संबध्द नसलेली तथ्ये जर अशा मतांना पुष्टी देत असतील किंवा त्यांचेशी विसंगत असतील तर ती तथ्ये संबध्द असतात.

# कलम ४७ :- हस्ताक्षराबाबतचे मत केव्हा संबध्द

एखादा दस्ताऐवज कोणत्याही व्यक्तीने लिहीला असावा किंवा स्वाक्षरीत केला असावा याबाबत जेव्हा न्यायालयाला मत बनवायचे असेल, तेव्हा ज्या व्यक्तीने तो लिहीला किंवा स्वाक्षरीत केला असा समज आहे. तिच्या हस्ताक्षराशी परिचीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे तो दस्ताऐवज त्या व्यक्तीने लिहीला किंवा स्वाक्षरीत केला होता. किंवा नव्हता याविषयीचे मत हे संबध्द तथ्य असते.

# कलम ४७-अ :- इलेक्ट्रॉनिक सही संदर्भात मत केव्हा संबध्द असते

ज्यावेळी न्यायालयास इलेक्ट्रॉनिक सही कोणाची आहे. या बाबत मत बनवायचे असेल त्यावेळी इलेक्ट्रॉनिक सहीचा दाखला देणा-या अधिका-याचे मत हे संबध्द तथ्य असते.

# भारतीय पुरावा अधिनियम

# Indian Evidance Act

वंसत मोरे,

पोलीस निरीक्षक.

गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक

# कलम ४५ :- तज्ञांची मते

जेव्हा विदेशी कायद्याच्या किंवा शास्त्राच्या किंवा कलेच्या एखाद्या मुद्याबाबत अथवा हस्ताक्षर किंवा बोटांचे ठसे हे तेच आहेत किंवा काय? याबाबत न्यायालयाला मत बनवायचे असेल, तेव्हा अशा विदेशी कायद्यात, शास्त्रात किंवा कलेत अथवा हस्ताक्षरांची किंवा बोटांच्या ठशांची ओळख पटविण्याच्या प्रश्नांबाबत विशेष कौशल्या संपादन केलेल्या व्यक्तींची त्या मुदयांवरील मते हि संबध्द तथ्ये असतात.

अशा व्याक्तींना तज्ञ असे म्हटले जाते.

# कलम ४५ अ :- इलेक्ट्रॉनिक पुराव्याच्या तपासणीसाचे मत

कार्यवाहीच्या दरम्यान जेव्हा न्यायालयाला संगणक साधनामध्ये पारेषीत केलेल्या किंवा साठविलेल्या किंवा इतर कोणत्यातरी इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल स्वरुपात असलेल्या कोणत्याही माहीतीच्या संबधात मत तयार करावयाचे असेल तेव्हा माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००० याचे कलम ७९-अ, मध्ये निर्देष्टीत केलेल्या इलेक्ट्रॉनिक पुराव्याच्या तपासणीसाचे मत हे संबध्द तथ्ये असेल.

# कलम ४६ :- तज्ञांच्या मतांशी संबधीत तथ्ये

तज्ञांची मते संबध्द असतांना एरव्ही संबध्द नसलेली तथ्ये जर अशा मतांना पुष्टी देत असतील किंवा त्यांचेशी विसंगत असतील तर ती तथ्ये संबध्द असतात.

## कलम ४७ :- हस्ताक्षराबाबतचे मत केव्हा संबध्द

एखादा दस्ताऐवज कोणत्याही व्यक्तीने लिहीला असावा किंवा स्वाक्षरीत केला असावा याबाबत जेव्हा न्यायालयाला मत बनवायचे असेल, तेव्हा ज्या व्यक्तीने तो लिहीला किंवा स्वाक्षरीत केला असा समज आहे. तिच्या हस्ताक्षराशी परिचीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे तो दस्ताऐवज त्या व्यक्तीने लिहीला किंवा स्वाक्षरीत केला होता. किंवा नव्हता याविषयीचे मत हे संबध्द तथ्य असते.

# कलम ४७-अ :- इलेक्ट्रॉनिक सही संदर्भात मत केव्हा संबध्द असते

ज्यावेळी न्यायालयास इलेक्ट्रॉनिक सही कोणाची आहे. या बाबत मत बनवायचे असेल त्यावेळी इलेक्ट्रॉनिक सहीचा दाखला देणा-या अधिका-याचे मत हे संबध्द तथ्य असते.